
















| किड | रासायनिक औषध | वापराचे प्रमाण / १० लिटर |
|---|---|---|
| शेंगा पोखरणारी अळी, पिसारी पतंग | क्विनालफॉस २५ ई.सी.किंवा | २८ मि.ली. |
| | इमामेक्टिन बेन्झोएट ५ एस.जी.किंवा | ४.५ ग्रॅम |
| | स्पिनोसाड ४५ एस.सी. | ३ मि.ली. |
| शेंगमाशी | लॅमडा साय हॅलोथ्रीन ५% किंवा | १० मि.ली. |
| | डायमेथोएट ३०% | १० मि.लि. |

**शेतकऱ्यांनी वरील पंचसूत्रीचे अवलंबन केल्यास एकरी १८ ते २० क्वि.पर्यंत तूरीचे उत्पादन घेणे. सहज शक्य आहे. असे कृषि विज्ञान केंद्राने घेतलेल्या प्रात्यक्षिकातून दिसून आले आहे.**


**संपादक व प्रकाशक**

**डॉ. ला. रा. तांबडे**

**वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख**

• संकलक •

**प्रा.अमोल शास्त्री** — विषय विशेषज्ञ (कृषिविद्या)

**प्रा.प्रदिप गोंजारी** — विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार)

**डॉ. ला. रा. तांबडे** — वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख

**कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर**



**तांत्रिक माहिती स्त्रोत**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

प्रकाशन वर्ष : डिसें.२०१६ | एकूण घडी पुस्तिका क्र.४९ | एकूण प्रकाशन क्र.५७ | प्रति : २००० | एकूण खर्च : रू.४९३०/-(कृ.वि.के.सोलापूर.)


# तूर उत्पादनवाढीची पंचसूत्रे








**वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख**

**शबरी कृषि प्रतिष्ठान संचलित,**

## कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर

**सोलापूर-बार्शी रोड, मु.खेड, पो.केगाव,**

**ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर (महाराष्ट्र)**

**फोन : ०२१७-२५००१५३**

**Visit us at : www.kvksolapur.org**

# तूर उत्पादनवाढीची पंचसूत्रे

तुरीचे पिक हे कडधान्य उत्पादनाचे मुख्य स्त्रोत आहे. तुरीचे एकरी २० क्विंटल पर्यंत उत्पादन घेण्यासाठी खालील पंचसुत्रीचा अवलंब करावा.

## ● सुधारीत जातींचा वापर -

१) बी.डी. एन-७१६ (२०१६), १६०-१७५ दिवस कालावधी, तांबडे दाणे, फुलांची व शेंगाची संख्या जास्त, ४ दाण्यांच्या शेंगा, बागायती ठिबकवर लागवडीसाठी उत्तम प्रतिसाद.

२) बी.डी.एन.-७११ (२०१२) पांढरे दाणे, एकावेळी फुलोऱ्यात येणारा व परिपक्व होणारा वाण, मर व वांझ रोग प्रतिकारकक्षम, मशीनने काढणीस योग्य. वरील सुधारित जाती बरोबर विपुला, बीएसएमआर-७३६, बीएसएमआर-८५३, बीएसएमआर-७०८ किंवा फुले राजेश्वरी या सुधारित वाणांचा वापर करावा.







## ● बीज प्रक्रिया -

पेरणीपूर्वी ट्रायकोडर्मा या बुरशी नाशकाची ५ ग्रॅम प्रति किलो बियाणे व नंतर रायझोबियम व स्फुरद विरघणारे जीवाणू प्रत्येकी २५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात गुळाच्या थंड पाण्यातून बीजप्रक्रिया करावी.



## ● ठिबक सिंचनाचा वापर -



तुरीची रोपे ६ x ४ इंच आकराच्या प्लास्टीकच्या पिशवीत (माती + गांडूळखत) २० मे नंतर तयार करावीत. लागवड ६ x १.२५ फुट (मध्यम जमिन) ६ x २ फुट (भारी जमीन) अंतरावर रोपे १ महिन्याची झाल्यानंतर करावी.

## ● लागवड अंतरानुसार बियाणे प्रमाण व रोपांचीसंख्या

| लागवडीचे अंतर | एकरी रोपांची संख्या | बीयाणे प्रति एकरी |
|---|---|---|
| ५ x २ | ४,३५६ | १/२ किलो |
| ५ x १ | ८,७१२ | १ किलो |
| ६ x १.२५ | ५,८०८ | ७५० ग्रॅम |
| ६ x २ | ३,६३० | १/२ किलो |
| ३ x २ | ७,२६० | १ किलो |

लागवडीनंतर १५ दिवसात मुख्य शेंडा खोडावा, जेणे करून फुटव्यांच्या संख्येत वाढ होते.



## ● खत व्यवस्थापन




लागवडी पूर्वी एकरी ५ टन शेणखत जमिनीत चांगले मिसळावे. लागवड करताना एकरी ५० किलो डी.ए.पी., ५ किलो झिंक सल्फेट चा वापर करावा. ठिबकद्वारे खत व्यवस्थापनाकरीता १२:६१:०० हे वीद्राव्य खत २५ किलो प्रति एकर सुरूवातीच्या ४५ दिवसात द्यावे. दाणे भरताना ०:०:५० हे वीद्राव्य खत १० किलो प्रति एकर द्यावे.

पिक फांद्या फुटण्याच्या अवस्थेत असताना १% ,१९:१९:१९, फुलोऱ्यामध्ये असताना २% युरीया तर दाणे भरताना १% ०:५२:३४ या वीद्राव्य खताची फवारणी द्यावी.

## ● किड व रोग व्यवस्थापन :-

- ☐ मर व वांझ प्रतिबंधक वाणाची निवड करावी व बुरशीनाशकाची बीप्रक्रिया करावी.
- ☐ तुरीवर घाटेअळी, पिसारी पतंग, शेंगमाशी इ. किडीमुळे ३०-४०% नुकसान होते. किड नियंत्रणासाठी खालील एकात्मिक किड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा.
- ☐ उन्हाळ्यात खोल नांगरट करावी.
- ☐ अंबाडी, ज्वारी, मका, बाजरी या पिकांचा सापळापीक म्हणून वापर करावा.
- ☐ वेळेवर अंतरमशागत करून शेत स्वच्छ ठेवावे.
- ☐ एकरी २० पक्षिथांबे उभारावेत.
- ☐ कळी अवस्थेमध्ये निबोळी अर्क ५% फवारणी करावी.